मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८० ■ सोमवार, ०९ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# टीम इंडियानं तिसऱ्यांदा जिंकलं जग !

## अंतिम सामन्यात कीवींचा एकतर्फा पराभव करत लिहिला नवा इतिहास

**दैनिक युवक आधार**

**अहमदाबाद :** टीम इंडियानं आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक 2026 चं विजेतेपद पटकावलं आहे. रविवारी अहमदाबाद इथं खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारतानं 96 धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवलं. सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं कीवींजसमोर 256 धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघ 19 षटकांत अवघ्या 159 धावांत सर्वबाद झाला.

**भारतानं तिसऱ्यांदा जिंकला टी-20 विश्वचषक** : या विजयासह टी-20 विश्वचषकाच्या इतिहासात, तीन वेळा टी-20 विश्वचषक जिंकला आहे. याआधी भारतानं इंग्लंड आणि वेस्ट इंडिजसह दोन वेळा विश्वचषक जिंकला होता. मात्रन आता भारतानं न्यूझीलंडचा पराभव करत तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचा कारनामा केला आहे. यामुळं सलग दोनदा टी-20 विश्वचषक जिंकणारा तो पहिला संघ बनला आहे. यजमान संघानं टी-20 विश्वचषक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. दरम्यान, न्यूझीलंड पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्यात मागे पडला आहे.

**टॉप तीन फलंदाजांची अर्धशतकं :** प्रथम फलंदाजी करताना संजू सॅमसननं पुन्हा एकदा टीम इंडियासाठी शानदार फलंदाजी केली. यावेळी त्याला अभिषेक शर्मा आणि इशान किशन यांनी साथ दिली. संजू सॅमसननं फक्त 46 चेंडूत पाच चौकार आणि आठ षटकारांसह 89 धावा केल्या. अभिषेक शर्मानंही आपलं अर्धशतक गाठलं, त्यानं 21 चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांसह 52 धावा केल्या. इशान किशननंही 25 चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह 54 धावांची चांगली खेळी केली.

**सूर्य फ्लॉप दुबेची फटकेबाजी :** सामन्यात एकवेळ टीम इंडिया 270 धावांचा टप्पा ओलांडण्याच्या तयारीत दिसत होती, परंतु कर्णधार सूर्यकुमार यादव धाव न घेता बाद झाला. हार्दिक पांड्यानंही संथ खेळी केली, त्यानं 13 चेंडूत 18 धावा केल्या. तिलक वर्मा सहा चेंडूत 8 धावा करुन नाबाद राहिला. जेव्हा असं वाटत होतं की टीम



इंडिया 250 पेक्षा जास्त धावा करु शकणार नाही, तेव्हा शिवम दुबेनं जबाबदारी घेतली. त्यानं शेवटच्या दोन षटकांमध्ये स्फोटक फलंदाजी केली. त्यानं फक्त आठ चेंडूत 26 धावा केल्या, ज्यात तीन चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. शेवटच्या षटकात भारतानं एकूण 24 धावा केल्या. कीवींकडून जेमी निशमनं सर्वाधिक 3 विकेट घेतल्या.

**कीवींची फलंदाजी अपयशी** : भारतानं दिलेल्या 256 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात चांगली झाली नाही. फिन ॲलनच्या रुपात न्यूझीलंडचा पहिला बळी 31 धावांवर गेला. त्यानंतर, 32 धावांवर, रचिन रवींद्र 2 चेंडूत 1 धावा काढून बाद झाल्यानं कीवींना दुसरा धक्का बसला. मात्र, सलामीवीर टिम सायफर्टनं आपली हिंमत रोखली. त्यानं 26 चेंडूत 2 चौकार आणि 5 षटकारांसह 52 धावा केल्या. पण विजयासाठी ते पुरेसं नव्हतं. ग्लेन फिलिप्स 5 धावांवर आणि मार्क चॅपमन 3 धावांवर बाद झाले. न्यूझीलंडचा संघ 19 षटकांत 159 धावांवर बाद झाला. भारताकडून जसप्रीत बुमराहनं सर्वाधिक 4 विकेट घेतल्या.

**आयसीसीनं जाहीर केली 120 कोटी रुपयांची बक्षीसं :** या टी-20 विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता संघाव्यतिरिक्त इतर संघांना किती रक्कम दिली जाईल हे तुम्हाला माहिती असले पाहिजे. आयसीसीनं आधीच जाहीर केलं होतं की या वर्षीचा एकूण बक्षीस पूल 120 कोटी रुपयांचा असेल. याचा अर्थ असा की सर्व संघांना एकूण एवढी रक्कम मिळेल. म्हणजेच विजेता आणि उपविजेता संघाव्यतिरिक्त, चार उपांत्य फेरीतील संघ, सुपर-8 मध्ये पोहोचणारे आठ संघ आणि पहिल्या फेरीत बाहेर पडलेल्या संघांसाठी देखील बक्षीस निधी वाटप करण्यात आला आहे.

**विजेत्या संघाला 27 कोटी रुपये :** पहिल्यांदा विजेत्या संघाबद्दल बोलूया. म्हणजेच, आजचा सामना जिंकत विजेतेपद पटकावलेल्या संघाला किती रक्कम दिली जाईल? 2026 चा टी-20 विश्वचषक जिंकणाऱ्या संघाला अंदाजे ₹27 कोटी रुपये बक्षीस रक्कम मिळेल. आयसीसीनं विजेत्या संघासाठी 3 दशलक्ष डॉलर्सची बक्षीस रक्कम जाहीर केली आहे. रुपयाचं मूल्य डॉलरच्या तुलनेत चढ-उतार होत असल्यानं, आम्ही इथं फक्त अंदाजे रक्कम सांगू. उर्वरित बक्षीस रक्कम विजेत्या संघाला अंदाजे ₹27 कोटी मिळाल्यावर उघड होईल. तर या अंतिम सामन्यात पराभूत म्हणजेच उपविजेत्या संघाला अंदाजे ₹14 कोटी मिळतील.

**उर्वरित संघांनाही किती बक्षीस :** या वर्षीच्या टी-20 विश्वचषकात, भारत आणि न्यूझीलंड व्यतिरिक्त, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका उपांत्य फेरीत पोहोचले. भारत आणि न्यूझीलंड जिंकले आणि अंतिम फेरीत पोहोचले, तर इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका बाहेर पडले. या दोन्ही संघांना एकूण ₹7.24 कोटी मिळतील. त्यानंतर, 5व्या ते 12व्या क्रमांकाच्या संघांना प्रत्येकी ₹3.48 कोटी मिळतील. याशिवाय 13व्या ते 20व्या क्रमांकाच्या संघांना प्रत्येकी ₹2.29 कोटी मिळतील. आम्ही तुम्हाला पुन्हा सांगतो की आयसीसीनं बक्षीस रक्कम डॉलर्समध्ये जाहीर केली आहे, म्हणून आम्ही तुम्हाला रुपयांमध्ये सांगत असलेली रक्कम थोडी वेगळी असू शकते.

# शांतीवन आश्रमशाळा, वाकडी येथे छ. शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक 1 ची अंमलबजावणी करण्याकरता अपर तहसिल पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात 7 मार्च ते 8 मे दरम्यान मंडळ स्तरावरती एकूण पाच शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. प्रथम शिबिर नेरे महसूल मंडळामध्ये शांतीवन आश्रमशाळा, वाकडी येथे 7 मार्च रोजी आयोजित करून अभियानाला सुरुवात करण्यात आली. प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती या अभियानात देण्यात आली. तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी वाकडी गावच्या स्थानिक महिला बचत गटाच्या भगिनींनी पुढाकार घेवुन तेथे घरगुती मसाले व पापड यांचे स्टॉल



लावून विक्रीसाठी तरतुद केली होती. या कार्यक्रमास शांतीवन संस्थेचे चेअरमन ॲड प्रमोद ठाकुर, नायब तहसिलदार सुनिल जाधव, संभाजी शेलार, संतोष पाटील, तसेच नेरे मंडळातील आजी, माजी सरपंच व सदस्य, पोलीस पाटील उपस्थित होते.

वैशाली जाधव, उपअधीक्षक भूमी अभिलेख नैना प्राधिकरण व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरील नागरिकांना आवश्यक सर्व वेबसाईटची माहिती दिली, तसेच ऑनलाईन सुविधांची माहिती दिली. पाटील, सहदुय्यम निबंधक पनवेल यांनी तुकडे बंदीच्या दस्तनोंदणीच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत मार्गदर्शन केले. वल्लभ मसके, ग्राममहसुल अधिकारी पालेबुद्रुक यांनी विविध प्रकारच्या फेरफार नोंदी व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे यांची माहिती दिली. ई पिक पाहणीची कार्यपध्दती सांगितली तसेच ॲग्रीस्टॅक योजनेची कार्यपध्दती यांची माहिती दिली. हटकर, कृषि सहाय्यक, यांनी कृषि विभागाकडील विविध योजनांची माहिती दिली तसेच त्यांचेकडील योजनांच्या आधारे काही शेतकरी यांना पावर टिलर व ट्रॅक्टर यांस मंजुरी मिळाल्याबाबत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचा भाग म्हणुन प्रातिनिधीक स्वरुपात जात प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्य प्रमाणपत्र अशा विविध दाखल्यांचे वाटप करणेत आले, तसेच नवीन अर्ज दाखल करुन घेणेत आले. यावेळी वाकडी गावाच्या पाणंद रस्त्याचे 7/12 वाटप करणे, रिटघर गावचे स्मशानभूमीकडे जाणारा शेतपाणंद रस्ता याची मोजणी प्रक्रीया पुर्ण झाल्यामुळे त्याचा नकाशा उपस्थित ग्रामस्थ यांना देण्यात आला. तसेच जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी मौजे रिटघर, ता. पनवेल येथील स.नं. 124/0 च्या जमिनीपैकी 0.04.00 हे.आर. क्षेत्र प्राथमिक आरोग्य केंद्र रिटघर यांना मंजुर करणेत आले. त्याची मोजणी, ताबापावती व रजिस्ट्रेशनचे काम पुर्ण झाले असुन सरपंच दुंदरे तसेच गावकरी यांना कागदपत्रे देण्यात आली.

यानंतर उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक 1 ची अंमलबजावणी करण्याबाबत नागरीकांना मार्गदर्शन केले.

# केळवणे येथे "जाणता राजा" कला सांस्कृतिक आणि सामाजिक ग्रुप कडून शिवजयंती जल्लोषात साजरी



**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती एखाद्या सणाप्रमाणे सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी केली जाते, पनवेल तालुक्यातील सर्वात मोठे गाव केळवणे येथे "जाणता राजा" कला सांस्कृतिक आणि सामाजिक ग्रुप यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची ३९६ वी जयंती (तिथीनुसार ६ मार्च २०२६) अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरी झाली. गावातील विविध क्षेत्रातील मान्यवर ग्रामस्थ मंडळ, यांच्या हस्ते छत्रपतींच्या मूर्तीला अभिषेक, पूजन करून आणि सांस्कृतिक कार्यक्रमाने सुरुवात झाली, विद्यार्थ्यांच्या सादर केलेल्या शिव गीते,पोवाडे, आणि भाषणांनी संपूर्ण परिसरशिवमय झाले होते. दरवर्षीप्रमाणे कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शालेयभेट वस्तू वाटप करण्यात आल्या.संध्याकाळी संपूर्ण गावात भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. "जय भवानी, जय शिवाजी" शिवगर्जनाच्या घोषणांनी वातावरण दुमदुमले होते.

# डॉ. संतोष पाटील यांना 'स्वराज्य प्रेरणा' पुरस्कार प्रदान

## किल्ले तोरणा येथे राज्यस्तरीय गौरव; १५ वर्षांच्या पर्यावरण सेवेची दखल

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** स्वराज्य स्थापनेचे पहिले तोरण ज्या किल्ले प्रचंडगडावर (तोरणा) बांधले गेले, त्या ऐतिहासिक स्थळी शिवशंभू संघटनेच्या वतीने आयोजित 'हिंदवी स्वराज्य तोरण उत्सव ऐतिहासिक विजय दिना'चे औचित्य साधून सिल्लोड येथील डॉ. संतोष पाटील यांना 'स्वराज्य प्रेरणा राज्यस्तरीय पर्यावरण रक्षक पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सोहळा संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज अनिकेत महाराज मोरे (देहू), छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नागपूर गादीचे वंशज सचिन भोसले, येसाजी



कंक यांचे वंशज सिद्धार्थ कंक, शेलार मामा यांचे वंशज राहुल शेलार, शिवशंभू संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष तानाजी पवार आणि सातारा जिल्हा शिवसेना प्रमुख रेश्मा जगताप यांच्या हस्ते पार पडला. स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि मानाचा फेटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (गतीविधी) पर्यावरण दायित्वाखाली कार्यरत असलेल्या डॉ. पाटील यांनी गेली १५ वर्षे दुर्मिळ वनस्पतींचे रोपण, वन्यजीव संवर्धन आणि 'हरितवारी' यांसारख्या उपक्रमांत मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या निस्वार्थ सेवेची दखल घेत हा राज्यस्तरीय सन्मान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पाटील यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे शताब्दी वर्ष असून, मी हा पुरस्कार देशसेवेस समर्पित करत आहे." याप्रसंगी जॉकी चौधरी (पुणे), भाऊसाहेब निकोद (बहुली), भिकन सोन्ने यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पाटील यांच्या या यशाबद्दल राज्यभरातील पर्यावरण प्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# रंभा गावांचे सुपुत्र राजहंस वाढे सर यांना दादासाहेब फाळके राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर (रशिद शेख) :** पुणे शिवजयंती दिनांक 19 फेब्रुवारी 2026 रोजी पुणे येथे आयोजित भव्य पुरस्कार सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व सह्याद्री फिल्म प्रोडक्शन चे डायरेक्ट राजूरकर सर यांच्या हस्ते सोहळ्यात राजहंस वाढे यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले स्वराज्य फिल्म प्रोडक्शन आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडला आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने करण्यात आले आहे. दादासाहेब फाळके युनियनचे विदर्भ अध्यक्ष सामाजिक महाराष्ट्र राज्यांचे उपक्रम समाजापर्यंत प्रत्येक अडचणीला त्यांच्यापर्यंत पोहोचणारे पोलीस मित्र अपराध नियंत्रण मानवाधिकार संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष राजहंस वाढे यांना दादासाहेब फाळके पुरस्कार



सन्मानित करण्यात आले आहे.. त्यांना महाराष्ट्र राज्य मधून यांच्यावर अभिनंदन गुण गौरव होतं आहे पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत

# जि.प. शाळा गोळेगाव बु. येथे विज्ञान प्रदर्शनाचे उत्साहात आयोजन

## चिमुकल्यांच्या वैज्ञानिक आविष्काराने वेधले लक्ष

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोळेगाव बु. येथे नुकतेच विज्ञान प्रदर्शनाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध वैज्ञानिक प्रतिकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. विशेष म्हणजे, पहिली-दुसरीच्या चिमुकल्यांनी सादर केलेल्या मॉडेल्सनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन गट शिक्षणाधिकारी रमेश ठाकूर, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजीव फुसे तसेच पानवडोद केंद्राचे केंद्रप्रमुख जे.आर. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक शेख सादिक व नामदेवराव साखळे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षक अजीम देशमुख, पंजाबराव देशमुख, शेख अजहर, मुसद्दीक शेख, सय्यद लुबना, बुशरा सुलताना, सिद्दीकी नुजहत आलिया, शबाना इनामदार, सारिका नागे, शारदा कुमकर, सुरेखा थोरात, दिपाली गालम यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी वयोगटानुसार विविध विषयांवर आधारित प्रकल्प सादर केले. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी वनस्पतींची



वाढ, स्वच्छता, सौरऊर्जा व पाणी संवर्धन यावर सोपे प्रयोग मांडले. तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी जलचक्र आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व पटवून दिले. पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी सौरमाला, पाणी शुद्धीकरण यंत्र व पवनऊर्जेद्वारे वीज निर्मितीचे तंत्र समजावून सांगितले, तर सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी ज्वालामुखी उद्रेक, स्मार्ट सिटी, रेन वॉटर हार्वेस्टिंग व प्रदूषण नियंत्रण यांसारखी आधुनिक मॉडेल्स सादर करून आपली वैज्ञानिक समज सिद्ध केली.

शाळेत विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न ठेवता प्रयोगात्मक व सर्जनशील शिक्षण दिले जात असल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे मत उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केले. शेवटी शाळा परिवाराच्या वतीने उपस्थित पालक व ग्रामस्थांचे आभार मानण्यात आले.

# अन्वीच्या 12 सुपुत्रांची सुरक्षा दलात 'गरुडझेप'; ग्रामस्थांकडून लष्करी थाटात गौरव!

## भव्य मिरवणूक अन् पुष्पवर्षावाने दुमदुमली नगरी; देशप्रेमाच्या रंगात न्हाले अवघे गाव

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** कष्टाची जिद्द आणि देशप्रेमाचे स्वप्न उराशी बाळगून भारतीय सैन्य दल, पोलीस दल व निमलष्करी दलात भरती झालेल्या अन्वी (ता. सिल्लोड) येथील १२ सुपुत्रांचा शुक्रवारी (ता. ६) सायंकाळी समस्त ग्रामस्थांच्या वतीने अभूतपूर्व नागरी सत्कार करण्यात आला. ढोल-ताशांचा गजर आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी संपूर्ण अन्वी नगरी देशप्रेमाच्या रंगात न्हाऊन निघाली होती.

गावच्या मातीतील तरुणांनी विविध सुरक्षा दलांत झेप घेतल्याने ग्रामस्थांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. या यशाचे कौतुक करण्यासाठी आयोजित सोहळ्यात महाराष्ट्र पोलीस दलातील विकास अशोक सुरडकर, नितीन सपकाळ, पूजा शेनफड सुरडकर तसेच नयन नारायण पार्वे, योगेश दत्तू पार्वे



(एमएसएफ), गणेश नारायण चव्हाण (सीआयएसएफ), शिवराज दादाराव उघडे (टीए पॅरा), प्रल्हाद सुभाष सोन्ने (आर्मी एएमसी), अभिषेक सपकाळ (आर्मी), सागर अशोक नवल, शुभम संजय नवल (तटरक्षक दल) आणि साईनाथ डिगंबर भवर (बीएसएफ) या नवनियुक्त जवानांचा जाहीर सत्कार करण्यात आला. याचप्रमाणे माजी सैनिक कृष्णा सांडू चिंचपूरे आणि फौजदार नरेश पंडित यांचाही विशेष सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

सायंकाळी ६ वाजता गावातून या सर्व जवानांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील मुख्य बाजारपेठ आणि प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या मिरवणुकीत अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. ठिकठिकाणी सुवासिनींनी जवानांचे औक्षण केले, तर नागरिकांनी घराघरांतून फुलांचा वर्षाव करत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. मुख्य सत्कार सोहळ्यात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व जवानांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. "अन्वीसारख्या ग्रामीण भागातील मुले आज देशाच्या सीमा सुरक्षित करण्यासाठी सज्ज झाली आहेत, ही गावाची मान उंचावणारी बाब आहे," अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या. सत्काराला उत्तर देताना जवानांनी आपल्या मनोगतातून ग्रामीण भागातील तरुणांना मोलाचा संदेश दिला. कठोर परिश्रम, शारीरिक मेहनत आणि अभ्यासातील सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली असून, विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून देशसेवेसाठी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्याला गावातील प्रतिष्ठित नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी, तरुण मंडळ, महिला मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगरच्या सरला कामे यांना 'समाजभूषण कर्तृत्ववान महिला पुरस्कार' प्रदान

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ छत्रपती संभाजीनगर:** - सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर येथील श्रीमती सरला शामराव कामे – कुमावत यांना त्यांच्या उत्कृष्ट सामाजिक योगदानाबद्दल "समाजभूषण कर्तृत्ववान महिला पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले. पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या एका भव्य आणि उत्साहपूर्ण सोहळ्यात हा गौरव करण्यात आला.

महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या विविध उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी श्रीमती



सरला कामे यांनी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रेरणा मिळाली आहे.

या गौरव सोहळ्यास 'चला हवा येऊ द्या' फेम प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि सूत्रसंचालक डॉ. निलेश साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण लाभले. यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेच्या आमदार तथा भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा मा. श्रीम . चित्राताई वाघ यांचीही विशेष उपस्थिती लाभली.

व्यासपीठावर मा. श्रीम. वर्षाताई प्रशांत ठाकूर, मा. श्रीम. मोहिनीताई विक्रांत पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष (महिला मोर्चा) मा. श्रीम. प्रियाताई मकदम, पनवेलच्या माजी उपमहापौर मा. श्रीम. प्रतिभाताई पाटील, मा. श्रीम. नीलमताई नितीन जाधव, मा. श्रीम. अर्चनाताई परेश ठाकूर, मा. श्रीम. चारुशीलाताई घाटे आणि मा. श्रीम. राजश्रीताई वावेकर या सर्व मान्यवरांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीमती सरला कामे यांचा शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन यथोचित गौरव करण्यात आला.

हा सन्मान केवळ श्रीमती सरला कामे यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. भविष्यातही त्या समाजासाठी असेच प्रेरणादायी कार्य करत राहतील, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीमती सरला शामराव कामे – कुमावत यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# यासेर उर्दू प्राथमिक शाळा, सेलू येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** गौरव सेवाभावी संस्था संचलित यासेर उर्दू प्राथमिक शाळा, सेलू येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महिलांच्या कर्तृत्वाची व त्यांच्या समाजातील योगदानाची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महान महिलांविषयी माहिती सादर केली. विविध वर्गांतील विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, माता रमाई, सिंधुताई सपकाळ, बेगम हजरत महल, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मेरी कॉम, कल्पना चावला, राणी लक्ष्मीबाई, इंदिरा





गांधी, पंडिता रमाबाई, सरोजिनी नायडू, अरुणा आसफ अली, मदर टेरेसा, सानिया मिर्झा आदी महान महिलांच्या कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाची सुरुवात महिलांचे कार्य व त्यांचा सन्मान या विषयावर शाळेचे मुख्याध्यापक जावेद खान व फिरोज खान पठाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून झाली. त्यांनी महिलांचे समाजातील स्थान, त्यांचे योगदान आणि महिलांचा सन्मान करण्याचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार मांडले.

यावेळी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाबद्दल माहिती देताना सांगण्यात आले की, दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. हा दिवस महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय कर्तृत्वाचा सन्मान करणारा तसेच लैंगिक समानतेचा संदेश देणारा जागतिक दिवस आहे. महिलांच्या हक्कांसाठी झालेल्या ऐतिहासिक कामगार चळवळींमधून या दिवसाची सुरुवात झाली. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी या दिनाला अधिकृत मान्यता दिली असून १९७७ पासून या दिवसाचा जागतिक स्तरावर प्रचार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सय्यद अजीम, सय्यद अमन, शेख साजिद, शोएब अन्सारी आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# स्वाक्षरी पडताळणीला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : देशी दारू दुकान बंदीसाठी महिलांचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव : यवतमाळ :** प्रभाग क्रमांक १ मधील वादग्रस्त ठरलेल्या देशी दारू दुकानाच्या बंदीसाठी महिलांनी जोरदार एल्गार पुकारला आहे. नगरसेविका जयश्री संजय नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे मतदान प्रक्रियेची मागणी करत निवेदन सादर केले होते.या निवेदनावरील महिलांच्या स्वाक्षऱ्यांची पडताळणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिले होते. त्यानुसार शनिवारी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे पथक महागाव येथे दाखल झाले. निवेदनावरील सह्यांची खात्री करण्यासाठी महिलांना प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वाक्षरी करण्याचे



आवाहन करण्यात आले होते. सकाळी अकरा वाजल्यापासून मोठ्या संख्येने महिलांनी स्वाक्षरी पडताळणीसाठी गर्दी केली. निवेदनावरील सह्या आम्हीच केल्याची खात्री करून देण्यासाठी महिलांनी अधिकाऱ्यांसमोर पुन्हा स्वाक्षऱ्या केल्या. वृत्त लिहेपर्यंत सह्यांची पडताळणी प्रक्रिया सुरूच होती.या वेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक डी. एस. वाघ, उपनिरीक्षक अनिल पिकले, सुकेशनी शिंदे, जमादार वाघजी बोंबले, पंजाब राठोड तसेच कॉन्स्टेबल प्रतीक्षा उके आणि पूनम गटलेवार उपस्थित होते.दरम्यान, अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी आणि संबंधित देशी दारू दुकान कायमस्वरूपी बंद करण्यासाठी महिलांनी आखलेली रणनीती आणि घेतलेला पुढाकार चर्चेचा विषय ठरत असून, या आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.

नगराध्यक्षा रंजना आडे , संभाजीदादा नरवाडे ,नगरसेवक सुरेश पाटील नरवाडे ,शैलेश कोपरकर ,भाजपा तालुकाध्यक्ष दीपक आडे , शहराध्यक्ष नीलेश नरवाडे , संजय नरवाडे, उदय नरवाडे , रफिक सुरैया, डॉ.पंजाब राठोड , रियाज पारेख, बळीराम राठोड ,संजय अमिलकंठवार , आदींनी परिश्रम घेतले.

**मतदानाची तारीख जाहीर होण्याची संभावना**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने महिलांची सह्या पडताळणी केली. निवेदनात ५१ महिलांच्या स्वाक्षऱ्या होत्या.पडताळणीत ४ महिला काही कारणास्तव आल्या नाहीत.मात्र यामध्ये ४७ महिलांची सह्यांची पडताळणी पूर्ण झाली.आता पुढील प्रक्रिया हि मतदानाची राहणार असून लवकरच मतदानाची तारीख जाहीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# पांढुर्णा बु . येथे समीरदादा लेंगुळे यांचे शिवव्याख्यान उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटांजी तालुक्यातील पांढुर्णा बु. येथे शिवप्रेमी मित्रमंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवव्याख्यानाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याचे मुख्य वक्ते म्हणून प्रसिद्ध इतिहास अभ्यासक मा. श्री. समीरदादा लेंगुळे यांनी 'मुलुख मैदान तोफ' या शैलीत शिवचरित्रावर प्रभावी व्याख्यान दिले. त्यांच्या ओघवत्या वाणीने उपस्थित शिवप्रेमींना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून युवासेना जिल्हाप्रमुख मा. श्री. आकाश भाऊ राठोड, मा. श्री. कुंदनभाऊ टोंगे (कायर) आणि





श्री. मंगेशभाऊ मोहितकर यांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे अध्यक्षपद पांढुर्णा बु. चे पोलीस पाटील मा. श्री. चंद्रशेखर भाऊ ठावरी यांनी भूषवले. संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री. राजुभाऊ नगराळे यांनी केले.

शिवप्रेमी मित्रमंडळ पांढुर्णा बु. च्या वतीने करण्यात आलेल्या या यशस्वी नियोजनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बीड जिल्ह्यातील शिरसमार्गच्या सुपुत्राची वैद्यकीय क्षेत्रात झेप – डॉ . सुहास शारदा सुदामराव शेजाळ झाले हृदयरोगतज्ज्ञ

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/भीमराव गावडे :** बीड जिल्ह्यातील शिरसमार्ग येथील सामान्य कुटुंबातील सुपुत्र डॉ. सुहास शारदा सुदामराव शेजाळ यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत हृदयरोगतज्ज्ञ (Cardiologist) म्हणून मानाचा टप्पा गाठला आहे. ग्रामीण भागातून शिक्षण घेत मोठ्या वैद्यकीय संस्थांमध्ये पोहोचत त्यांनी यशाचा हा प्रवास पूर्ण केला आहे.

डॉ. सुहास शेजाळ यांचे प्राथमिक शिक्षण जयभवानी विद्यालय, गढी येथे झाले. त्यानंतर त्यांनी जवाहर नवोदय विद्यालय येथे बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण



केले. शिक्षणात सातत्याने प्रगती करत त्यांनी सन २०१३ मध्ये NEET परीक्षेत यश मिळवून वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश केला.यानंतर त्यांनी मुंबई येथील जी. एस. मेडिकल कॉलेज (KEM Hospital) या देशातील नामांकित वैद्यकीय महाविद्यालयातून MBBS पदवी संपादन केली. पुढे मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटल येथे MD (Medicine) पदवी पूर्ण करून वैद्यकीय क्षेत्रात आपली वाटचाल अधिक भक्कम केली.हृदयरोग विषयातील उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील रूबी हॉल क्लिनिक येथे DrNB (Cardiology) ही पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली. या प्रवासात त्यांनी सातत्यपूर्ण मेहनत, अभ्यास आणि समर्पणाच्या जोरावर हे यश संपादन केले.डॉ. सुहास शेजाळ यांच्या या उल्लेखनीय यशामुळे कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवारामध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात मिळवलेले हे यश अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# भादलवाडी गावात महिला दिनानिमित्त बालआरोग्य शिबिर

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** भादलवाडी ता. इंदापूर गावात महिला दिनाच्या पूर्वसंध्येला (७ मार्च २०२६) वर्चस्व ग्रुप भिगवण तर्फे मोफत बालरोग आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.अनुश्री चिल्ड्रन्स अँड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,इंदापूरचे बालरोग तज्ञ मा.डॉ.रविराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरात परिसरातील ११३ लहान मुलांनी आरोग्य तपासणी करून घेतली.प्रमुख पाहुणे म्हणून भगवानराव





भरणे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अनुष्का भरणे,पंचायत समिती सदस्य हेमाताई माडगे,जिल्हा परिषद सदस्य सोनाली जाधव,मयुरी माने उपस्थित होते.तसेच गावचे पोलीस पाटील तनुजा कुताळ,भिगवण पोलीस स्टेशनचे अधिकारी, सरपंच,ग्रामस्थ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ मेटे सर,चव्हाण मॅडम,वणवे सर यांनी सहभाग नोंदवला.

मा.अनुष्का भरणे यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा देत वर्चस्व ग्रुपचे अध्यक्ष संतोष कुताळ,शैलेश परकाळे व सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार मानले.या उपक्रमामुळे गावातील बालकांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढली असून महिला दिनाच्या निमित्ताने समाजहिताचे कार्य करण्याचा आदर्श वर्चस्व ग्रुपने घालून देण्यात आला असल्याचे मत यावेळी प्रमुख पाहुणे यांनी व्यक्त केले.

# विंधणे शिवमय! अश्वारुढ शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे भव्य लोकार्पण"

**दैनिक युवकआधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** फ्रेंड्स फोरएव्हर सेवाभावी संस्थेचा स्तुत्य उपक्रम; दोन दिवस धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांनी गाव झाले शिवमय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त दिनांक ५ व ६ मार्च २०२६ रोजी उरण तालुक्यातील विंधणे गावात ग्रामस्थ आणि फ्रेंड्स फोरएव्हर सेवाभावी संस्था यांच्या वतीने दोन दिवसीय भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे तालुक्यातील सर्वात मोठ्या अश्वारूढ शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे लोकार्पण. पुतळ्याचे अनावरण होताच नाशिक ढोल, तुतारी, नगारे आणि फटाक्यांच्या रोषणाईने परिसर दणाणून गेला. उपस्थित शिवभक्तांनी एकमुखाने "छत्रपती शिवाजी महाराज की जय!" अशा घोषणांनी वातावरण शिवमय केले.

या सोहळ्यानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सह्याद्रीरत्न श्री. धिरेंद्र ठाकूर पाणदिवेकर यांचे छत्रपतींच्या इतिहासाला उजाळा देणारे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी "छत्रपतींचे चार स्वराज्य, चार वाघनखं, इतिहासातील दुसरी पावनखिंड, सोळावं वर्ष – छत्रपती शिवराय आणि आम्ही" अशा वेगळ्या आणि अभ्यासपूर्ण विषयांवर भाष्य करत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रभावी शैलीत सादर झालेल्या व्याख्यानामुळे उपस्थितांच्या अंगावर शहारे आले. शेवटी त्यांनी त्यांच्या "शिवचिंतन" या पुस्तकातील शिवस्तोत्र पठण केले असता सर्व शिवभक्तांनी हात जोडून शिवछत्रपतींना मानवंदना दिली.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शाहीर रामानंद उगले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जोशपूर्ण पोवाडे व लोकगीतांचा कार्यक्रम सादर केला. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या पराक्रमाच्या गाथा सांगणाऱ्या वीररसपूर्ण पोवाड्यांनी उपस्थितांमध्ये अभिमान आणि उत्साहाची लाट उसळली. इतिहासातील घटनांचे वर्णन करताना पोवाडे, भारूड



आणि लोकगीतांमधून समाजप्रबोधनाचा संदेशही देण्यात आला.शिवजयंतीच्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखीत भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत घोड्यावर बसलेले शिवाजी महाराज, शंभूराजे आणि राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत तरुण सहभागी झाले होते. या भव्य मिरवणुकीत गावातील तरुण, अबालवृद्ध आणि लहान मुलांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.या सोहळ्यास आमदार महेश बालदी, आंतरराष्ट्रीय कामगार नेते व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, युवा उद्योजक अश्वित थळी, राजिप सदस्य अविनाश ठाकुर, पनवेल पंचायत समिती सदस्य मयूर शेलार, आपटा जय शिवराय मित्र मंडळाचे नरेश पाटील, जयराम पाटील, पांडुरंग पाटील, मरुआई नाट्य मंडळाचे डायरेक्टर व माजी उपसभापती उरण जे. डी. जोशी, गाव अध्यक्ष शामकांत नवाले, उद्योजक वामनशेठ पाटील, प्रसाद पाटील (गंपूशेठ), प्रमोद शेळके, ॲड. विलास पाटील, बळीराम नवाले, गजानन पाटील, संजय केणी, सामाजिक कार्यकर्ते सुनिल जोशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांचे स्वागत शिवमूर्ती, संस्थेची कार्यपुस्तिका, शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन फ्रेंड्स फोरेव्हर सेवाभावी संस्था विंधणेचे अध्यक्ष राजन लोखंडे, उपाध्यक्ष प्रल्हाद पाटील, प्रदीप शेळके, खजिनदार कल्पेश पाटील, सचिव संदेश पाटील, सल्लागार सीताराम थळी, समाधान जोशी तसेच संस्थेच्या अन्य कार्यकर्त्यांनी केले.

संपूर्ण दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे प्रसिद्ध निवेदिका रंजना संजय केणी यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले.

विंधणेच्या मातीत रंगलेला हा शिवसोहळा आणि शिवचरित्राचा जागर संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरला असून, फ्रेंड्स फोरेव्हर सेवाभावी संस्थेने उभारलेले शिवस्मारक हे शिवभक्तांच्या अभिमानाचे प्रतीक ठरले आहे." हर हर महादेव ", " छत्रपती शिवाजी महाराज की जय"

# लोणवाडी जि.प. शाळेत शिक्षणाचा 'श्रीगणेशा' अन् डिजिटल भरारी!

## महिला दिनानिमित्त तालुकास्तरीय मेळावा; अद्ययावत संगणक लॅबचे लोकार्पण

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लोणवाडी येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'शाळापूर्व तयारी' अभियानाचा शुभारंभ, तालुकास्तरीय महिला मेळावा आणि लोकसहभागातून साकारलेल्या अद्ययावत संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन अशा त्रिवेणी सोहळ्याचा 'श्रीगणेशा' शनिवारी (दि. ७) मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून सिल्लोड तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या अभियानांतर्गत लोणवाडी व लक्ष्मीनगर येथील नवप्रवेशित बालकांचे 'पहिले पाऊल' उपक्रमाद्वारे स्वागत करण्यात आले. यावेळी चिमुकल्यांच्या हाता-पायांचे ठसे कार्डबोर्डवर उमटवून त्यांना शैक्षणिक साहित्य, टोपी व फुगे देण्यात आले. हा सोहळा पाहून उपस्थित मातांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते.

ग्रामीण विद्यार्थ्यांनी जागतिक स्पर्धेत



टिकावे, या उद्देशाने ग्रामपंचायत व शाळा निधीतून उभारलेल्या अद्ययावत संगणक लॅबचे उद्घाटन नवनिर्वाचित जि.प. सदस्या मंगलताई केशवराव तायडे यांच्या हस्ते करण्यात आले. "डिजिटल साक्षरता ही काळाची गरज असून, शाळेने उचललेले हे पाऊल ग्रामीण विकासासाठी मैलाचा दगड ठरेल," असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी राजीव फुसे यांनी "किती केला तरी आदर कमी पडतो, पुढे 'आई' तुझ्याही ईश्वर कमी पडतो," या ओळींतून महिलांचा गौरव केला. गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "मुलांच्या बौद्धिक व शारीरिक विकासाची सुरुवात खेळांतून आणि मातृभाषेतून व्हावी, तरच मुलांना शाळा आपली वाटेल."

या सोहळ्याला माजी जि.प. सदस्य हरी किसन आप्पा सुलताने, पोपटराव सुलताने, जयाजी सुलताने, सरपंच रावसाहेब सुलताने, उपसरपंच कारभारी काटकर, शा.व्य. समिती अध्यक्ष कारभारी सुलताने, सोसायटी चेअरमन कोंडीबा सुलताने, डॉ. शालिनीताई सुलताने, लक्ष्मण सावळे, अंबादास सुलताने, अनिल सुलताने, संतोष सुलताने, नारायण सुलताने यांच्यासह ग्रामस्थ, अंगणवाडी व आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी केंद्रप्रमुख सर्जेराव जाधव, मुख्याध्यापक मुनिराज भालेराव, अनिता इंगळे, दिपाली गवई, श्रीमती झेंडे, श्रीमती कोलते, सुरेश संभेराव, संचित धन्वे, राजू सुलताने यांनी परिश्रम घेतले. महिला दिनानिमित्त संचित धन्वे यांच्यातर्फे सर्व महिलांना पुस्तक भेट देण्यात आले. सूत्रसंचालन दिपाली गवई यांनी केले, तर आभार संचित धन्वे यांनी मानले.

# शासनाच्या महाराजस्व समाधान शिबिराचा पहिला टप्पा मौजे उसरखुर्द येथे संपन्न

## रायगडचे उपजिल्हाधिकारी मा. श्रीकांत गायकवाड यांची विशेष उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे महसूल विभागा मार्फत तळा तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा पहिला टप्पा 7 मार्च रोजी मौजे उसरखुर्द येथे सुरू करण्यात आला. शिबिरामध्ये मा.ना.आदिती ताई तटकरे महिला व बाल कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी चित्रफितीद्वारे नागरिकांना मार्गदर्शन करून तळा तालुक्यातील नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन केले. 18 फेब्रुवारी ते 5 मार्च या कालावधीमध्ये तळा महसूल विभागाच्या अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत करण्यात आलेल्या जनजागृतीमुळे शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये तळा तालुक्यातील महसूल विभागामार्फत नागरिकांना साधारणत: 30 उत्पन्नाचे दाखले, 19 वय व अधिवास दाखले, 12 नॉन क्रिमिलेयर दाखले, 16 जातीचे दाखले वाटप करण्यात आले. जिवंत




सातबारा अंतर्गत मयत व्यक्तींच्या वारसाची नोंद घेऊन 203 शेतकऱ्यांना डिजिटल सातबारा व 8 अ उतारे वाटप करण्यात आले. तसेच नागरीकांची 11 प्रलंबित फेरफार निकाली काढण्यात आले. 12 नागरिकांची आधार नोंदणी तसेच 5 शेतकऱ्यांची एग्री स्टॅक नोंदणी करण्यात आली. संजय गांधी योजनेच्या 7 पात्र अर्जदारांना योजनेचा लाभ मंजूर करून मंजुरीचे आदेश देण्यात आले. पंचायत समिती तळा मार्फत पाच लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले. महिला व बालविकास विभागामार्फत दोन लाभार्थ्यांना बेबी किटचे वाटप करण्यात आले. महाराजस्व समाधान शिबिराकरता रायगडचे उपजिल्हाधिकारी भुसंपादन मा. श्रीकांत गायकवाड, तळा तहसीलदार मा. स्वाती पाटील, नायब तहसीलदार मा. धर्मराज पाटील, मा. किशोर मालुसरे, मा. समिरा खाडे, मंडळ अधिकारी, तळा महसूल सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी, तसेच पंचायत समिती सहाय्यक गटविकास अधिकारी मा.सुनील गायकवाड, मा.दिपाली शेळके सीडीपीओ, पंचायत समिती विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, पंचायत समिती सदस्य मा. रवींद्र मांडवकर, तसेच पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक महिला दिनानिमित्त भाजप अलिबागकडून सफाई कामगार महिलांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** जागतिक महिला दिनानिमित्त तसेच भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हा महामंत्री मा. सतीश धारप यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप अलिबाग शहर शाखेने अलिबाग नगर परिषदेतील महिला सफाई कामगारांचा भव्य सन्मान केला. समाजाच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या या महिलांच्या अथक परिश्रमाचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अलिबाग नगर परिषदेचे नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला सुनील दामले, ॲड. वैशाली बंगेरा, पल्लवी जोशी, तनुजा पेरेकर, विजेता सारंग, धीरज ओसवाल, ॲड. मानस कुंटे, प्रसाद वैशंपायन, निखिल चव्हाण यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमात नगर परिषदेतील स्वच्छता कर्मचारी महिलांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा पुष्पगुच्छ, सत्कारचिन्ह व शाल देऊन गौरव करण्यात आला. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी या महिला



सफाई कामगार ऊन, वारा, पावसात दिवसरात्र मेहनत घेतात. त्या नेहमीच ठरलेल्या वेळेवर प्रत्येक गल्लीबोळात पोहोचतात, कचरा गोळा करतात आणि स्वच्छता राखतात. त्यांच्या या कटिबद्धतेमुळे शहरात रोगराई फोहोमफोल होत नाही, तर आपले आरोग्य सुरक्षित राहते. उपस्थित मान्यवरांनी या महिलांच्या परिश्रमाची दखल घेत, "तुमच्या कष्टांमुळे शहरच नव्हे, तर आपले आरोग्य आणि पर्यावरणही सुरक्षित आहे," अशी भावना व्यक्त केली.महिलांचे समाजातील योगदान अतुलनीय असून, त्यांच्या कार्याचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे यावेळी सांगितले गेले. महिला दिनानिमित्त त्यांच्या सेवेला सलाम करत, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# युवा उद्योजक हरिभाऊ लगड यांच्याकडून पिंपरखेड शाळेला संगणक संच भेट

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील हिवरा गावचे भूमिपुत्र व पुणे येथे स्वतःच्या कर्तृत्वावर उद्योग उभारून नावलौकिक मिळवलेले युवा उद्योजक हरिभाऊ लगड यांनी सामाजिक बांधिलकी जपत पिंपरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला संगणक संच व प्रिंटर भेट देऊन विद्यार्थ्यांच्या संगणकीय शिक्षणाला मोठी चालना दिली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे आणि ते शिक्षणात प्रगती करावेत या हेतूने त्यांनी हा उपक्रम राबविला.

आजच्या संगणकीय युगात शिक्षण क्षेत्रामध्ये संगणकाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही या आधुनिक शिक्षणाचा लाभ मिळावा, ते स्पर्धेच्या युगात मागे पडू नयेत हा उद्देश मनाशी बाळगून हरिभाऊ



लगड यांनी पिंपरखेड शाळेला संगणक संच व प्रिंटर भेट देत एक आदर्श उपक्रम राबविला आहे.

यापूर्वीही त्यांनी या शाळेला प्रिंटर भेट दिला होता. त्यावेळी शाळेला संगणक उपलब्ध करून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते. दिलेला शब्द पाळत त्यांनी संगणक संच शाळेला भेट देऊन आपली सामाजिक बांधिलकी जपली असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाची मदत केली आहे.पिंपरखेड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संगणक व प्रिंटरची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण घेण्यात अडचणी येत होत्या. ही बाब लक्षात आल्यानंतर पुणे येथे उद्योग व्यवसाय करत असलेले युवा उद्योजक मा.हरिभाऊ शिवलिंग लगड यांनी पुढाकार घेत शाळेला संगणक संच व प्रिंटर उपलब्ध करून दिला. शाळेत संगणक व प्रिंटर आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी मिळाल्यामुळे शिक्षक व ग्रामस्थांनीही समाधान व्यक्त केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुढे जावे, शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे व गावाचे नाव उज्ज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त करत हरिभाऊ लगड यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात मेहनत घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष महादेव चव्हाण, माजी ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर शंकर चव्हाण, युवा नेते सागर चव्हाण, भगवान पालवे अध्यक्ष डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरम,मा. कुमार घोडके प्रगतीशील शेतकरी,विनोद काळे, शाळेचे मुख्याध्यापक असलम शेख सर, पदवीधर शिक्षक अतुल चव्हाण सर व सतीश एकशिंगे सर महादेव आमले सर आदी उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापनाने हरिभाऊ लगड यांचे आभार मानले असून त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वनोजा येथील पाणीप्रश्नावर संजय देशमुख सक्रिय; अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा.!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** वनोजा येथील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांच्या वतीने *खासदार संजय देशमुख यांच्या दिग्रस येथील निवासस्थानी* भेट घेऊन गावातील पाणीप्रश्नाबाबत निवेदन सादर केले. व यावेळी गावातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती खासदार साहेबांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

वनोजा गावातील जलस्तर मोठ्या प्रमाणात खालावल्याने सध्या भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. गावातील अनेक विहिरींनी तळ गाठला असून घरगुती बोअर आटले आहेत. दुसरीकडे धरणातील पाणीसाठ्यातही मोठी घट झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे गावातील जलसंकट अधिक गडद झाले आहे. अजून उन्हाळ्याचे दोन महिने बाकी असतानाच अनेक विहिरी कोरड्या पडल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. विशेषतः महिलांना व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी वनवण करावी लागत असून येत्या एप्रिल व मे महिन्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भविष्यातील पाणीस्थितीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, दोन वर्षांपूर्वी शासनाकडून वनोजा येथे जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' योजनेअंतर्गत नळपाणीपुरवठा योजनेचे काम सुरू करण्यात आले होते. या योजनेसाठी सुमारे ४ कोटी ९५ लाख २४ हजार ३०० रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीत केंद्र व राज्य शासनाचा सहभाग आहे. सदर योजना जुलै २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र कालावधी पूर्ण होऊनही



२०२६ वर्ष सुरू असतानाही या योजनेचे काम अद्याप अपूर्ण असून अनेक महिन्यांपासून काम रखडलेले आहे. त्यामुळे गावकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही. परिणामी यंदाच्या उन्हाळ्यातही वनोजा येथील नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहेया संदर्भात गावातील लोकप्रतिनिधी व नागरिकांनी संबंधित विभागाकडे वारंवार पत्रव्यवहार करूनही प्रशासनाकडून आवश्यक ती दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार संजय देशमुख यांनी या प्रश्नाची गंभीर दखल घेत महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेले काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी डॉ.सुनील राऊत पवन राऊत एकनाथ राऊत व ग्रामस्थ उपस्थित होते.

# बाहेरील नोकर भरतीमुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी व भूमिपुत्रांवर अन्याय; हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनी विरोधात शेतकरी आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/ प्रदीप पाटील :** चिरनेर ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनीवर हिंद टर्मिनल्स सी एफ एस कंपनी उभारली असून, या कंपनीसाठी येथील 40 शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. या कंपनीने बाधित प्रकल्पग्रस्त 40 शेतकऱ्यांच्या वारसांसह स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीमध्ये सामावून घेण्याचे आश्वासन दिले असताना देखील, कंपनी सुरू होऊन एक महिन्यापेक्षा जास्त दिवस उलटून जाऊन, देखील कंपनी येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त बाधित शेतकऱ्यांच्या वारसांना तसेच येथील स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीने कामावर ठेवून न घेता मुजोर कंपनीने 30 जानेवारी रोजी सुमारे दोनशे कामगार बाहेरून आणून कंपनी चालू केली आहे. बाहेरील नोकर भरतीमुळे प्रकल्पग्रस्त शेतकरी व भूमिपुत्रांवर अन्याय.झाल्याने हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनी विरोधात शेतकरी आक्रमक झाले आहेत.इतकेच नाही तर स्थानिक एकही कामगार आम्ही कंपनीत कामावर घेणार नाही ही ठाम भूमिका कंपनीने घेतली आहे. स्थानिकांना कंपनी विरोधात जे काय करायचे असेल ते करू शकता. अशी कंपनी प्रशासनाने बाधित शेतकरी स्थानिकांना धमकी देखील दिली आहे. कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांची दिशाभूल व मनमानी करून, शेतकऱ्यांवर व भूमिपुत्रांवर मोठा अन्याय केला असून शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचा डाव कंपनीने अवलंबिला आहे. त्यामुळे येथील भूमिपुत्रांनी संताप व्यक्त केला असून, भूमिपुत्र शेतकरी कंपनी प्रशासना विरोधात न्याय हक्क मागण्यासाठी आक्रमक झाला आहे. त्यासाठी मंगळवारी 10 मार्च रोजी भूमिपुत्र शेतकरी एकत्र येत, मुजोर कंपनीच्या विरोधात प्रवेशद्वारासमोर भूमिपुत्रांना योग्य तो न्याय मिळेपर्यंत बेमुदत आंदोलन करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

या आंदोलनाचे लेखी निवेदन पोलीस आयुक्त नवी मुंबई, पोलीस उपायुक्त परिमंडळ- 2 बेलापूर, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावाशेवा बंदर उरण, जिल्हाधिकारी रायगड अलिबाग, उरण तहसीलदार, उपअभियंता सा. बा. विभाग उरण या संबंधित खात्यांना चिरनेर गावातील शिष्टमंडळाचे तथा प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष हिराजी बारकू ठाकूर, सरपंच भास्कर मसणाची मोकल, शिवसेनेचे उरण तालुका प्रमुख संतोष हिराजी ठाकूर, भाजपचे पूर्व विभाग सह खजिनदार सुशांत सुधीर पाटील, शेकापचे पूर्व विभाग सहचिटणीस सुरेश गजानन पाटील, चिरनेर गाव तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार अंकुश परदेशी व ग्रामस्थांसह शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले आहे.




यात कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी कंपनी जबाबदार राहील असेही निवेदनात म्हटले आहे.

याबाबत सदर कंपनीचे बांधकाम सुरू असताना दिनांक 9 मार्च 2023 रोजी गावकऱ्यांनी कंपनी प्रशासनासोबत जेएनपीटीच्या अतिथीगृहात कॅप्टन निशित जोशी यांच्यासोबत विशेष बैठक घेतली होती. या बैठकीत भविष्यात या कंपनीमध्ये होणारी नोकरभरती व व्यवसाय हे फक्त चिरनेर गावातील बेरोजगार व येथील पात्र व्यवसायकांना देण्यात येतील असे कंपनीने गावकऱ्यांना आश्वासन दिले होते. त्याचबरोबर हिंद कंपनीमध्ये 40 बेरोजगारांना परमनंट नोकऱ्या देण्याचे कंपनीने मान्य केले होते. त्यासाठी 40 बेरोजगारांची यादीही कंपनीकडे दिली होती . त्यानंतर 4 एप्रिल 2024 मध्ये वरील पत्राचे स्मरण पत्रही कंपनीस दिले गेले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तदनंतर कंपनीचे काम पूर्णत्वास येत असताना, प्रकल्पग्रस्त शेतकरी व येथील ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार ग्रामपंचायत चिरनेरच्या वतीने दिनांक 31 ऑक्टोबर 2025 रोजी येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना व भूमिपुत्रांना नोकरी धंद्यामध्ये सामावून घेऊन, प्रथम प्राधान्य देण्यात यावे. अशा प्रकारची कंपनीस नोटीस देण्यात आली होती. परंतु कंपनी प्रशासनाने याकडे जाणून बुजून कानाडोळा करत दुर्लक्ष करून, कंपनीने बाहेरून दोनशे कामगार आणून, 30 जानेवारी रोजी कंपनी सुरू केली. या कंपनीमध्ये गावातील एकही कामगार कंपनीत कामावर घेणार नाही अशी ठाम भूमिका कंपनी प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे येथील स्थानिक भूमिपुत्र व शेतकरी संकटात सापडले आहेत. पिढ्यांची पिढ्यांची पिकती शेती कंपनीने संपादित केल्यामुळे तेही हक्काचे भाताचे उत्पादन गेले आहे. त्यामुळे येथील भूमिपुत्रांवर मोठा अन्याय झाला आहे. त्याचबरोबर कंपनीने पाणलोट क्षेत्रावर केलेल्या मातीच्या भरावामुळे येथील पिकती भात शेती धोक्यात आली आहे. पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे भात पिके कुजून जात आहेत. पाण्याचा निचरा होण्याचे नैसर्गिक नाल्यांचे मार्ग भरावामुळे बंद झाले असल्यामुळे येथील शेतकऱ्यांची शेकडो एकर जमीन नापीक झाली आहे. दूषित पाणी शेतात सोडले जात असल्यामुळे भात शेतीबरोबर कडधान्य ,आंबा व अन्य पिकांवर विपरीत परिणाम होऊ लागला आहे. कंपनीकडे तक्रारी करूनही कंपनी शेतकऱ्यांना दाद देत नसल्यामुळे येथील शेतकरी संकटात आला आहे. या भरावामुळे चिरनेर गावातील जवळपास 600 गावकऱ्यांच्या घरामध्ये पुराचे पाणी जाण्याची भीती निर्माण झाली आहे. अवजड वाहनांमुळे चिरनेर गावाच्या हायवेवर वाहतूक कोंडी होत आहे. त्याचा त्रास नाहक प्रवाशांसह गावकऱ्यांना सोसावा लागत आहे. नोकऱ्या उद्योगधंद्यांमध्ये कंपनीने स्थानिकांना जाणून बुजून डावळले असून, बाहेरील कामगार भरती व बाहेरच्या ठेकेदारांना कंपनीची कामे दिली जात आहेत. एकंदरीत हा येथील भूमिपुत्रांवर कंपनी मोठा अन्याय करत आहे. असेही निवेदनात म्हटले आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना, भूमिपुत्रांना कंपनी कामावर ठेवून घेत नसेल तर आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनीत उभारण्यात आलेली ही कंपनी बंद करण्यात यावी. असाही इशारा येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसह भूमिपुत्रांनी दिला आहे.

चिरनेर येथील प्रकल्प ग्रस्त शेतकरी, गावातील सर्वपक्षीय नेते, व चिरनेर ग्रामपंचायत या सर्व मिळून एक शिष्टमंडळ तयार केले आहे. शिष्टमंडळाने 24 फेब्रुवारी 2026 रोजी कंपनीला पत्र पाठवून यावर तोडगा काढण्यासाठी बैठक बोलाविण्यात यावी. असे कंपनीला कळविले होते. मात्र कंपनीने यशस्वी मंडळाचा अपमान करून बैठक नाकारली. त्यामुळे येथील स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकरी व भूमिपुत्रांना योग्य तो न्याय मिळावा यासाठी मंगळवारी 10 मार्च रोजी कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा शिष्टमंडळाने दिला असताना, कंपनीने न्यायालयामार्फत 10 मार्च 2026 रोजी प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेला नोटीस बजावून कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले असल्याची माहिती प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेमार्फत देण्यात आली.

## अनसिंग ता वाशिम येथे छत्रपती शिवाजी महाराज 'महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** प्रशासकीय सेवा थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने, आज ७ मार्च २०२६ रोजी अनसिंग येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अत्यंत उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन आणि मार्गदर्शन मा. जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

प्रशासकीय यंत्रणेची मोठी उपस्थिती

या महसूल शिबिरासाठी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष उपस्थिती लावून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यामध्ये प्रामुख्याने निवासी उपजिल्हाधिकारी श्री. घुगे साहेब, उपविभागीय अधिकारी देवकर मॅडम, तहसीलदार श्री. निलेश पळसकर साहेब, तसेच नायब तहसीलदार आडे साहेब नप्ते साहेब देवळे लटारे साहेब उपधीक्षक भूमिअभिलेख श्री प्रवीण कुंजीर दुय्यम निबंधक वाशीम श्री विजय सूर्यवंशी गट विकास अधिकारी श्री रवींद्र सोनोने आणि मंडळ अधिकारी इढोळे साहेब सर्व मंडळ अधिकारी वाशीम तालुका ग्राम महसूल अधिकारी वाशीम तालुका उपस्थित होते. याप्रसंगी परिसरातील अनसिंग मंडळातील सर्व गावांतील ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, विविध विभागांचे शासकीय अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**एकाच छताखाली १५ सेवांचा लाभ**

या शिबिराचे मुख्य आकर्षण म्हणजे महसूल विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या महत्वपूर्ण सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. यामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र,




सातबारा उतारा दुरुस्ती, आणि इतर विविध शासकीय योजनांच्या अर्जांचा समावेश होता. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्हीची बचत झाली.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप**

कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी महोदयांच्या हस्ते अनेक लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जांनुसार विविध दाखले आणि प्रमाणपत्रांचे प्रत्यक्ष वाटप करण्यात आले. "शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यासाठी प्रशासनाने जनतेच्या दारी येऊन सेवा द्यावी, हाच या समाधान शिबिराचा मुख्य हेतू आहे," असे मत यावेळी जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर यांनी व्यक्त केले.

थोडक्यात पण महत्त्वाचे: अनसिंग परिसरातील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला असून, प्रशासनाच्या या 'दप्तरमुक्त' आणि 'गतिमान' कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी महसूल विभाग भूमी अभिलेख विभाग नोंदणी व मुद्रांक विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## सौ.निर्मला रमेश मचाले यांना 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार'

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** जागतिक महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२६' स्पर्धेचा निकाल जाहीर झाला असून सौ.निर्मला रमेश मचाले यांना या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.शिक्षकांचे राज्यस्तरीय व्यासपीठ 'शिक्षक ध्येय', मातृसेवा फाउंडेशन आणि यशिता गार्डन नर्सरी यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहोचावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कर्तृत्वाला योग्य व्यासपीठ मिळावे या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली होती.

राज्यातील एकूण ३७ महिलांना या पुरस्काराने गौरविण्यात आले असून सौ. निर्मला रमेश मचाले यांचा सन्मान हा स्त्रीशक्तीच्या प्रेरणादायी प्रवासाला अधोरेखित करणारा ठरला आहे.या पुरस्कारप्राप्तीच्या निमित्ताने मातृसेवा फाउंडेशनच्या संध्या सावंत,



यशिता गार्डन नर्सरीचे अथर्व यशवंत गडवार,शिक्षक ध्येयचे मधुकर घायदार, तसेच प्रभाकर कोळसे,कविता चौधरी, सुरेखा उजगरे, डॉ.फकिरा राजगुरू,डी. जी.पाटील, राजेश चायंदे,प्रेमजीत गतीगंते,भाग्यश्री पवार,मेघा पाटील,विलास मेश्राम,श्रद्धा पवार,अशरफ आंजर्लेकर,अर्चना भरकाडे,महेंद्र सोनेवाने आदींनी सौ.निर्मला मचाले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या गौरवामुळे समाजातील महिलांच्या कर्तृत्वाला नवी दिशा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सौ. निर्मला रमेश मचाले यांचा हा सन्मान स्त्रीशक्तीच्या उज्ज्वल कार्याचा प्रेरणादायी ठेवा ठरला आहे.

## मुंडगाव येथे महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिर !!

**दैनिक युवक आधार**

**अकोट(अकोला) :** अकोट तालुक्यातील मुंडगाव येथे मुंडगाव महसूल मंडळातील सर्व गावांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन आज करण्यात आले होते. शिबिराला अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबिराचे ठिकाणी पंचायत समिती अकोट , तालुका कृषी अधिकारी, अकोट तालुका आरोग्य अधिकारी अकोट, महावितरण कार्यालय अकोट , पशुसंवर्धन विभाग महिला व बाल विकास विभाग चे अधिकारी व कर्मचारी हजर होते. तसेच मुंडगाव मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, ग्रामसेवक हजर होते.सदर शिबिरामध्ये महसूल मंत्री यांच्या चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात महसूल



विभागाने नागरिकांसाठी घेतलेले निर्णय व योजनांबाबत उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी उपस्थित नागरिकांना माहिती दिली. त्याचप्रमाणे इतर विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सुद्धा त्यांच्या विभागामार्फत नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या सेवा व योजनांची माहिती उपस्थित नागरिकांना दिली. तसेच विविध दाखले, सातबारा व प्रमाणपत्र यांचे वाटप करण्यात आले.

## घाटंजी येथील गिलानी महाविद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

: घाटंजीयेथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालयात २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या विज्ञान दिनाचा मुख्य विषय "विकसित भारतासाठी महिला वैज्ञानिक" हा होता. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि त्यांना संशोधनाची आवड लागावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी संस्थेचे सन्माननीय सदस्य डॉ.






एम. ए. शहेजाद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी सांगितले की, विज्ञान हा केवळ अभ्यासाचा विषय नसून ती विचार करण्याची एक पद्धत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी नेहमी चिकित्सक वृत्ती जोपासावी. मार्गदर्शक वक्ते प्रा. आशिष गोदुरवार यांनी "आजचा विद्यार्थीच उद्याचा वैज्ञानिक आहे" असे सांगत विज्ञान आणि तंत्रज्ञानातील युवकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. एस. माहुरे होते. त्यांनी आपल्या भाषणात विज्ञान शाखेच्या उपक्रमांचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांनी समाजाला उपयोगी पडेल अशा संशोधनाकडे वळावे, असा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. जगताप यांनी केले.या सोहळ्याला रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. जगताप, डॉ. टी. एम. कोटक, डॉ. सी. आर. कासार, डॉ. एस. एच. शेख आणि प्रा. कु. जे. पी. मोरे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भाविका जाधव हिने केले, तर आभार प्रदर्शन कु. गौरी बिजेवार हिने केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. आर. डी. घोडिले, प्रा. पी. बी. राठोड, प्रा. सि. एम. शहाकर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाप्रती नवी ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या विवाह सोहळ्यात जिव्हाळा कला संच

**दैनिक युवक आधार**

**श्री क्षेत्र माहुर गड (प्रतिनिधी) सय्यद ईसा :** आर्णी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व नगर परिषद आर्णी चे माजी नगराध्यक्ष श्री अनिल भाऊ आडे यांचा भाचा चि. बंकेश बाबाराव पवार ( गव्हरमेंट ऑफ इंडिया )यांचा विवाह सोहळा द व्हेनेशियन फंक्शन हॉल यवतमाळ येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.पाहुणे मंडळीचे मनोरंजन व प्रबोधन व्हावे या उद्देशाने पवार




परिवाराने सिने कलावंत डॉ.सुनिल चव्हाण निर्मित जिव्हाळा कला संच यांना निमंत्रित करण्यात आले होते. संच्यातील कलावंत डी.जी.साखरे. अशोक इंगोले .अशोक बनसोडे .शिवाजी चौरे.राजेश मेश्राम.अंकुश कोटरंगे .रोशन आडे. जिशान मेश्राम. विलास राठोड. मोहिणी राठोड .रक्षा राघोर्ते व डॉ.सुनिल चव्हाण यांनी एका पेक्षा एक सुंदर अशी भावगीते .भक्ती गीते.लग्न गीते .

हिंदी मराठी बंजारा गीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. संगीतमय. मंगलाष्टकाने कार्यक्रमाची सांगता झाली या वेळी बरीच पाहुणे मंडळी उपस्थित होती. पवार परिवाराच्या वतीने श्री अनिल भाऊ आडे यांच्या हस्ते डॉ सुनिल चव्हाण यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वंचित बहुजन आघाडीची विचारधारा तळागाळात पोहचवणार : हनुमंत दादा मोरे

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** "भीक नको सत्तेची", सत्ता हवी हक्काची,"या वाक्या प्रमाणे श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने वंचित बहुजन आघाडी तळागाळात पोहचविण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे सर्व कार्यकर्ते कामाला लागले आहेत.त्याचाच एक भाग म्हणून वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित परतूर तालुका अध्यक्ष हनुमंत दादा मोरे यांच्या नेतृत्वाखाली आंबा येथे वंचित बहुजन आघाडीच्या शाखेचे उदघाटन नुकतेच करण्यात आले.



ह्या प्रसंगी उपस्थित वंचित बहुजन आघाडीचे जालना पुर्व जिल्हा अध्यक्ष रामप्रसाद थोरात यांनी मनोगत व्यक्त केले, चौखा नाना सौंदर्य ,जमिर भाई शेख, शिवाजी डोळस, गौतमजी खंडागळे, नामदेव नाचन, वंचित बहुजन आघाडीचे तालुका, दिपक डोके, युवा नेते सचिन भदर्गे ,सिद्धार्थ कांबळे, पत्रकार राज भदर्गे, दीपक पाटोळे, साहिल जाधव , संकेत मुजमुले, गजानन मस्के, अख्तर शेख, विकास दत्ता भदर्गे, गणेश, विलास डोके, समाधान भदर्गे, अरविंद भदर्गे , विकास साठे, मिनाज सय्यद , निसार शेख, अकबर शेख, लखन केवट,भरत पाटोळे, आकाश मगर , ,आकाश दशरथ भदर्गे, विष्णू साठे, गंगाधरराव गोरे, गणेश गोरे ,आशिष शिलवंत, कोंडीबा आंबेगावकर , संदिप भदर्गे ,करण जाधव , अकबर शेख ,बालासाहेब गायकवाड, निसार शेख, दत्ता मुळे ,भारत काठोळे व इतर मान्यवर. उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप भदर्गे यांनी केले तर कार्यक्रमाचा शेवट वंचित बहुजन आघाडीचे जालना पूर्व जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर यांनी केले.

# नागपुरात 'शहाकार' सोसायटीचा मोठा घोटाळा?

## वानाडोंगरीत बेकायदेशीर लेआउट व प्लॉट विक्रीचा आरोप; जिल्हाधिकारी नगर पालिका शाखेकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असलेल्या शहाकार गृह निर्माण सहकारी सोसायटी, नागपूर यांच्या कथित बेकायदेशीर जमीन व्यवहारांमुळे वानाडोंगरी परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते गजानन ढाकुलकर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी (नगर पालिका शाखा), नागपूर यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल केली आहे.



तक्रारीनुसार, सदर सोसायटी नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी नोंदणीकृत असतानाही वानाडोंगरी व वागधरा (इसासनी) परिसरातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर जमीन व्यवहार करून बेकायदेशीर पद्धतीने लेआउट तयार करण्यात आले. तसेच संबंधित जमिनींचा सोसायटीच्या नावावर फेरफार न करता थेट प्लॉट पाडून विक्री करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ही बाब महसूल व नगररचना नियमांचे उल्लंघन असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.याशिवाय सोसायटीच्या बायलॉजच्या विरोधात जाऊन ग्रामीण भागातील व्यक्तींना नागपूर मनपा क्षेत्रातील रहिवासी दाखवून नियमबाह्य पद्धतीने सभासद नोंदणी केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही व्यक्तींकडून लाखो रुपयांचे व्यवहार झाल्याचे लेखापरीक्षण अहवालात नमूद असतानाही संबंधितांना अद्याप विक्रीपत्र देण्यात आले नसल्याचेही तक्रारीत नमूद आहे.दरम्यान, एमआयडीसी पोलीस स्टेशन नागपूर येथे श्रीमती सिंधू रामकृष्ण नरूले यांच्या तक्रारीवरून स्व. सेवकराम दिनबाजी शहाकार व सतीश भाऊराव शहाकार यांच्या विरोधात भा.दं. वि. कलम ४२० अंतर्गत गुन्हा दाखल असल्याची माहितीही समोर आली आहे. इतक्या गंभीर बाबी असूनही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.या प्रकरणात स्पेशल ऑडिट, उच्चस्तरीय चौकशी आणि वानाडोंगरी परिसरातील कथित बेकायदेशीर लेआउट रद्द करण्याची मागणी तक्रारदारांनी केली आहे. तसेच महसूल व नगररचना विभागामार्फत सर्व जमीन व्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.तक्रारीच्या प्रती सहकार आयुक्त, विभागीय आयुक्त नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर व भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग यांना पाठवण्यात आल्या असून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वाशिम शहरातील प्रमुख रस्त्यांसाठी निधीची मागणी

## नगराध्यक्ष अनिल केंदळे यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : वाशिम शहरातील प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाल्याने त्यांची तातडीने दुरुस्ती करून कॉंक्रिट रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी वाशिम नगर परिषदेचे नगराध्यक्ष अनिल माधवराव केंदळे यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी निवेदन देऊन शहरातील रस्त्यांसाठी तातडीने निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे.




निवेदनानुसार, वाशिम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक, महाराणा प्रताप सिंह चौक ते हिंगोली नाका, रेल्वे स्टेशन परिसर तसेच अकोला नाका ते आर. ए .कॉलेज या मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. हे प्रमुख रस्ते पूर्णपणे खरडून गेले असून, ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. परिणामी वाहन चालकांसह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष केंदळे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन देऊन स्टेट बँक वाशिम ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर पुलासह व दुभाजकासह सिमेंट कॉंक्रीट रस्ता करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. दरम्यान, पालकमंत्री जानेवारी महिन्यात वाशिम दौऱ्यावर आले असताना देखील नगराध्यक्ष केंद्र यांनी या रस्त्याच्या प्रश्नाबाबत चर्चा करून निवेदन दिले होते, तसेच या कामासाठी निधी मिळविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक या रस्त्याचे काम नगर परिषदेच्या निधीतून सर्वांच्या संमतीने लवकरच हाती घेतले जाणार असल्याचेही नगराध्यक्ष केंदळे यांनी स्पष्ट केले, पाणीपुरवठा फिल्टर कामही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> **उपलब्ध न झाल्यास सर्व नगरसेवकांची चर्चा करू नगरपरिषद निधीतून शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक रस्त्याचे काम सुरू करण्यात येणार आहे.**
>
> **–अनिल केंदळे,नगराध्यक्ष, वाशिम**

**पिवळ्या पाण्यापासून मुक्तता**

दरवर्षी उन्हाळ्यात शहरातील नागरिकांना पिवळसर पाण्याचा पुरवठा होत असल्याने त्रास सहन करावा लागत होता. मात्र यावर्षी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत फिल्टर चे काम हाती घेण्यात येत असल्यामुळे नागरिकांना पिवळ्या पाण्याचा समस्ये तून दिलासा मिळणार असल्याची माहिती केंदळे यांनी दिली.

# रहिमाबादमध्ये शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याची भव्य स्थापना ; ७ किमीची रॅली अन् जल्लोषाने परिसर भगवेमय

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:-** ताऐ रहिमाबाद येथे तिथीनुसार शिवजयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याची (स्मारकाची) शुक्रवारी (ता. ०६) अभूतपूर्व उत्साहात स्थापना करण्यात आली. प्रशासकीय नियमांचे पालन करत, ग्रामपंचायत कार्यालयासमोर नियोजित स्थळी हा सोहळा संपन्न झाला. संभाजीनगर येथून पुतळा आणताना झालेली २० वाहनांची रॅली आणि ७ किलोमीटरच्या शिस्तबद्ध मिरवणुकीने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.



या ऐतिहासिक सोहळ्यासाठी रहिमाबादमधील प्रत्येक घरावर भगव्या ध्वजाची गुढी उभारण्यात आली होती, तर मुख्य चौकाचौकात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक संभाजीनगर येथून आणताना मार्गावर फुलंब्री व सिल्लोड येथे विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांनी स्मारकाचे पूजन करून अभिवादन केले. अन्वी फाटा येथे स्मारकाचे आगमन होताच हजारो तरुणांनी ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषी स्वागत केले. येथून सात किलोमीटर अंतरापर्यंत शेकडो तरुणांनी दुचाकींसह भव्य मिरवणूक काढली. अन्वी गावात महिलांनी स्मारकाचे ठिकठिकाणी औक्षण व पूजन केले.

सायंकाळी ४ वाजेपासून रहिमाबाद बसस्थानकापासून ते गावापर्यंत ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. गावाच्या प्रवेशद्वारावरील कमानीला आकर्षक फुलांची सजावट करून रात्री ७ वाजता स्मारकाची प्रतिष्ठापना करण्यात आली. शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा सरपंच सुभाष नवल यांनी सहपत्नीक पूजन व आरती करून पुतळ्याचे अनावरण केले. यावेळी झालेल्या भव्य फटाक्यांच्या आतिषबाजीने अवघे गाव उजळून निघाले होते. या संपूर्ण सोहळ्यासाठी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ग्रामस्थांच्या एकजुटीने आणि प्रशासनाच्या सहकार्याने पार पडलेला हा सोहळा तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

# नागपुर में 24 स्टार प्राइड क्लब द्वारा महिला दिवस का आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर** : 24 स्टार प्राइड क्लब द्वारा अंतरराष्ट्रीय महिला दिवस बड़े उत्साह के साथ हैबिट रेस्टोरेंट, नागपुर में मनाया गया।

कार्यक्रम का आयोजन अध्यक्ष ऋचा जैन के नेतृत्व में तथा समन्वयक आकांक्षा दरड़ा, मैथली मेघरे और श्री कमल शर्मा के सहयोग से किया गया। इस अवसर पर मुख्य अतिथि श्रीमती संतोष लड्डा, अध्यक्ष – शिक्षण समिति, नागपुर महानगरपालिका उपस्थित रहीं।अतिथि



प्रधानया लाखे कार्यक्रम में क्लब के सदस्य डॉ. प्रवीण गुप्ता, डॉ. अंकिता अग्रवाल, लायन आनंद इंगले, डॉ. अरुणिमा पानसे, अनुपम भगत, डॉ. अनुपमा गुप्ता, मनीषा अग्रवाल, डॉ. सुमित सूद, राजकुमार जैन अनिल मोहता, पंकज अग्निहोत्री, तृप्ति अग्रवाल, आशीष जैन और डॉ. शिवांगी गर्ग उपस्थित थे।

इस अवसर पर मुख्य अतिथि के हाथों सभी महिला सदस्यों का सम्मान (फेलिसिटेशन) किया गया। कार्यक्रम में महिला सशक्तिकरण, एकता और सम्मान की भावना को विशेष रूप से रेखांकित किया गया।कार्यक्रम का समापन हर्षोल्लास के साथ हुआ और सभी उपस्थितजनों ने इसे सुव्यवस्थित और प्रेरणादायक आयोजन बताया।

# मार्चला दिल्लीत जातीनिहाय जनगणनेसाठी रणशिंग; भंडारा जिल्ह्यातून ओबीसी बांधव मोठ्या संख्येने रवाना होणार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/ लाखनी भंडारा** : केंद्र सरकारने अनुसूचित जाती-जमातींसह इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजाचीही जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र, जनगणना आयुक्तांनी प्रसिद्ध केलेल्या प्रश्नावलीत ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नसल्याने समाजात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २३ मार्च रोजी दिल्लीतील जंतरमंतर येथे देशव्यापी आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघ व संलग्न संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे आंदोलन दुपारी २ ते ५ या वेळेत पार पडणार आहे. या आंदोलनात देशभरातील ओबीसी बांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असून भंडारा जिल्ह्यातूनही अनेक कार्यकर्ते दिल्लीकडे रवाना होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

**या आहेत प्रमुख मागण्या**

या आंदोलनाद्वारे केंद्र सरकारसमोर काही महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात येणार आहेत. त्यामध्ये ओबीसींची स्पष्ट जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, प्रलंबित 'यूजीसी बिल २०२६' तातडीने लागू करावे, केंद्र स्तरावर स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन करावे तसेच २०१७ पासून न वाढवलेली क्रिमीलेअरची मर्यादा वाढवून ती २० लाख रुपये करण्यात यावी, या मागण्यांचा समावेश आहे.

ओबीसी समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती अचूकपणे समजून घेण्यासाठी जातीनिहाय जनगणना होणे आवश्यक असल्याचे मत समाजातील विविध संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. केवळ अनुसूचित जाती-जमाती व धर्माची नोंद न करता ओबीसी समाजाची स्वतंत्र नोंद घेणे आवश्यक असल्याची मागणी आंदोलनातून जोरदारपणे मांडली जाणार आहे.

**सहभागाचे आवाहन**

या आंदोलनात भंडारा जिल्ह्यातील जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. मुकेश पुडके, समन्वयक के. झेड. शेंडे, उपाध्यक्ष सदानंद बुरडे, शहराध्यक्ष अंबादास मंदुरकर, प्रा. उमेश सिंगनजुडे, डॉ. आशिष माटे, आशिष वंजारी तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून कार्यकर्ते दिल्लीतील आंदोलनासाठी मोठ्या संख्येने रवाना होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# नारीशक्तीचा जागर 'कलश एंटरटेनमेंट कडून 24 महिलांना 'अस्तित्व नारी सन्मान' प्रदान!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कलश इंटरटेनमेंट संस्थेच्या वतीने अस्तित्व नारी सन्मान सीजन ३ सोहळा ७ मार्च रोजी उरण येथील अंगण लॉन येथे मोठ्या उत्साहात पार पडला .संस्थेच्या संस्थापिका श्लोक निखिल पाटील आणि सह संस्थापिता कल्पना समीर सुर्वे यांच्या कल्पनेतून साकारलेल्या उपक्रमाद्वारे समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २४ महिलांना व्यासपीठ मिळवून देत त्यांचा येथे गौरव करण्यात आला.




कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध मराठी अभिनेत्री निशिगंधा वाड, शैलजा घरत, निता बालदी,भावना घाणेकर, आरती ढोले, शर्मिन भाईजी, बडीगर, आल्तोफिन, ममता म्हात्रे ,सोमय्या सिंग, विशाल शिंदे ,नितीन वर्तक, अभिजीत लोटलीकर,चंदुकाका सराफ केवल सर्विया श्लोक पाटील यांचे आईवडील कल्पना सुर्वे यांच्या मातोश्री आदी मान्यवर उपस्थित होते , ढोल ताशांच्या गजरात पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. दीप प्रज्वलाना नंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी निशिगंधा वाड यांनी महिलांच्या अस्तित्वाविषयी आणि 'स्वत्व' या विषयावर मार्गदर्शन करत स्त्रियांच्या कामाची ही पोचपावती त्यांना पुढील प्रवासासाठी मोठी प्रेरणादायी असा विश्वास व्यक्त केला. ल्लेखनीय कार्य करणाऱ्या २४ महिलांना सन्मान चिन्ह प्रशस्तीपत्र व रोप देऊन सन्मानित करण्यात आले. सत्कारमूर्ती मध्ये अर्पिता मुखर्जी, रंजीता पाटील, प्रीती पाटील, रोमशा सिंग ,कीर्ती कवळे, ,पायल स्वरुप, प्रियांका आजगावकर ,आरपीएफ एएसआय शोभा मोटे,मोहिनी पुजारी, माधवी म्हात्रे ,आशिमिक कामटे, विमल भिडे, कांचन राऊत ,कलावती उपाध्ये ,दिशा मशिळकर, सीमा पाटील, गौरी शिरसागर, लता नाखवा, प्रियांका घरत ,निशा शिरधनकर ,आरती ढोले, श्रुतिका वांद्रे, प्राजक्ता असरकर, प्रियवंदा तांबोटकर यांचा समावेश होता. या सोहळ्यात स्वप्ना महाडिक, दीपिका माळी, सरिता म्हात्रे सोनल जैन, गिफ्ट पार्टनर्स म्हणून यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक शेट्टी यांनी आपल्या ओघवत्या व बहारदार शैलीत केले. ज्यामुळे कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आली.

आशमिक कामटे आणि त्यांचे शिष्य श्रेय पांचाळ यांची जुगलबंदी ची लावणी आणि फॅशन शोने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे वार्तांकन करण्यासाठी नामांकित वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांचा गौरव करण्यात आला. सन्मानित महिलांनी उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत अशा प्रोत्साहनामुळे आम्हाला काम करण्याची नवी उभारी मिळते असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्लोक पाटील आणि कल्पना सुर्वे यांनी उपस्थितांचे आभार मानले. "आमचा उद्देश फक्त सन्मान करणे नाही तर या महिलांच्या कार्याची ओळख जगाला करून देणे, हा आहे "असे सांगताना आयोजकांचे मन भरून आले. यापुढे केवळ उरणच नाही तर बाहेरील भागातील महिलांसाठी अशी संधी उपलब्ध करून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. उपस्थितांचे आभार मानताना वातावरणात एक भावनिक ओलावा निर्माण झाला होता. त्यानंतर सहभोजनाने सुंदर आठवणींचा या सोहळ्याची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कलश इंटरटेनमेंट च्या संस्थापिका श्लोक पाटील सहसंस्थापिका कल्पना सुर्वे व सदस्य स्वप्ना महाडिक , प्रियांका घरत, नक्षत्र तोगरे, खुशी बामने, मनीषा डोईफोडे, प्रियांशी सावंत दिपाली कासारे आणि ज्या ज्या लोकांचे सहकार्य लाभले या सर्वांचे योगदान ही महत्त्वाचे आहे.

# राज्याच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी ठोस तरतूद नसल्याने नाराजी :– जिलानी शेख

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा प्रतिनिधी :** राज्य सरकारने सादर केलेल्या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी ठोस व विशेष तरतूद करण्यात आलेली नसल्याने दिव्यांग बांधवांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दिव्यांगांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य व स्वावलंबनासाठी अपेक्षित असलेल्या योजनांबाबत अर्थसंकल्पात स्पष्ट घोषणा नसल्याचे मत व्यक्त होत आहे. दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्राचे जिलानी शेख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या बाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, "अर्थसंकल्प हा सर्व समाजघटकांचा असतो; परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी ठोस तरतूद नसणे ही त्यांच्या हक्कांची उपेक्षा आहे." राज्यातील अनेक दिव्यांग व्यक्तींना आज ही मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी येत आहेत. शासनाच्या परिपत्रकानुसार दिव्यांग व्यक्तींना व्यवसायासाठी २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे



दिसून येत आहे. त्या मुळे अनेक दिव्यांग नागरिकांना स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी जागेचा मोठा अडथळा निर्माण होत असल्याने शासनाने या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधी खर्च करण्याचा नियम असला तरी तो निधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मर्यादित उत्पन्नातून न देता शासनाने ग्राम पंचायत, नगर पंचायत व पंचायत समितींना दिलेल्या निधीतून स्वतंत्रपणे उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ही करण्यात आली आहे. या मुळे दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना आणि सुविधा प्रभावीपणे राबविता येतील, असे मत व्यक्त करण्यात आले. या शिवाय दिव्यांग व्यक्तींसाठी संजय गांधी निराधार योजनेचे मानधन वाढविणे, दिव्यांगांसाठी स्वतंत्र घरकुल योजना सुरू करणे, स्वयंरोजगारासाठी बिनव्याजी कर्ज योजना, ई-रिक्षा व इलेक्ट्रिक सायकल उपलब्ध करून देणे, कौशल्य विकास प्रशिक्षण, मोफत आरोग्य सेवा, कृत्रिम अवयव व सहाय्यक साधने उपलब्ध करून देणे, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्ती अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. वैभव देशमुख, अशोक दगडखैर, बजरंग लांडगे, ईश्वर आमटे, पोपट पोकळे, हनुमंत काळुसे, संतोष राख, ईश्वर माने, दत्ता कदम, संदिपान नागरगोजे, शेख नदीम, सय्यद मतीन, महादेव तांबारे, संतोष मकाळ इत्यादींनी ही मागणी केली आहे.

# ग्रो कॅपिटल आर्थिक घोटाळा : मास्टरमाईंड 'बंटी-बबली' अटकेत

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर/दिग्रस प्रतिनिधी :** जादा परताव्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गाजत असलेल्या ग्रो कॅपिटल आर्थिक घोटाळ्यात अखेर मोठी कारवाई झाली आहे. या प्रकरणातील कथित मास्टरमाइंड म्हणून ओळखले जाणारे पुष्पांजली दिनेश रंधेरिया आणि मनोज अशोक पाटील उर्फ "बंटी-बबली" यांना अटक करण्यात पुसद पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या दोघांची न्यायालयात हजेरी लावल्यानंतर त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली असून या अटकेमुळे प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दिग्रस शहरात जादा परताव्याचे आमिष दाखवत सात जणांच्या टोळीने तब्बल ७ कोटी ४३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. शिक्षक, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना लक्ष्य करून





ही फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे, त्याचा भाऊ शिक्षक विनोदकुमार दुधे आणि गिरीश दुधेचा मुलगा मंदार दुधे यांना अटक झाली असून ते सध्या यवतमाळ कारागृहात आहेत.

तपासादरम्यान या संपूर्ण जाळ्यामागे विश्वांजली आणि ग्रो कॅपिटल या कंपन्यांचे कथित मालक पुष्पांजली रंधेरिया आणि मनोज पाटील यांचा प्रमुख हात असल्याची माहिती समोर आली. "बंटी-बबली" या चित्रपटाच्या धर्तीवर या दोघांनी एक टीम तयार करून सर्वसामान्य नागरिकांना जादा परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे.

माहितीनुसार, दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे हा या दोघांच्या संपर्कात आला आणि कमिशनच्या आमिषाला बळी पडला. त्याच्या माध्यमातून अनेकांनी गुंतवणूक केली. मात्र आतापर्यंत केवळ ३७ गुंतवणूकदारांनी पोलिसांकडे अधिकृत तक्रार नोंदवली आहे.

या आर्थिक घोटाळ्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी जे यांच्या मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक रवी चव्हाण, सुनील मदने, पंकज पातुरकर, राहुल मडावी व पुसद पोलिस गेल्या दोन महिन्यांपासून करीत आहेत.दरम्यान मुख्य सूत्रधार समजल्या जाणाऱ्या "बंटी-बबली" जोडीच्या अटकेमुळे तपास अधिक वेगाने पुढे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात अजून काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने आता पोलिस पुढे कोणती कारवाई करतात आणि गुंतवणूकदारांना न्याय कसा मिळतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अर्थसंकल्प राज्याच्या प्रगतीला चालणा देणारा – आ. सुरेश धस

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला असून हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला तसेच पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणारा सर्वसमावेशक आणि संधी निर्माण करणारा असल्याची प्रतिक्रिया आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी दिली. या बाबत बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना ही अत्यंत महत्त्वाची असून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीककर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा निर्णय शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा आहे. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना



प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णयही सकारात्मक असल्याचे त्यांनी नमूद केले.या अर्थसंकल्पात शेतीमालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी उभारण्याचा निर्णय, कृषी क्षेत्रात डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे एकात्मिक इकोसिस्टीम निर्माण करण्याची योजना तसेच सिंचन आणि नदीजोड प्रकल्पांद्वारे दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन ही राज्याच्या विकासासाठी महत्त्वाची पावले असल्याचे धस यांनी सांगितले. तसेच महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लखपती दीदी अभियानाचा विस्तार, महिला बचतगटांसाठी उत्पादन व विक्रीसाठी सुविधा यांसारख्या योजना समाजातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राज्याच्या विकासाच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प दूरदृष्टी ठेवून तयार करण्यात आला असला तरी, आज उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्यात नाहीत, ही निश्चितच एक मोठी उणीव आहे, अशी भावना देखील आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली. राज्याच्या आर्थिक नियोजनात अजितदादांचा अनुभव आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरत आहे, असेही त्यांनी नमूद केले.एकूणच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, ग्रामीण भाग तसेच पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणारा ठरेल आणि राज्याच्या प्रगतीला गती देणारा ठरेल, असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

# प्रभात मित्र मंडळात 8 मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी : :** विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात ८ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी विभागातील शैक्षणिक,सामाजिक, राजकीय,क्रीडाविषयक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड होते.प्रमुख पाहुण्या म्हणून दैनिक द ग्लोबल टाईम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर तर विशेष अतिथी म्हणून नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव होत्या.नगरसेविका जाधव यांचीमुंबई महानगर पालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह शाल,व गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.शीतल हरीष करदेकर यांना सन्मानचिन्ह,शाल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव



ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी केले.

महिला दिन हा रोजचाच, महिलांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी दिलेला वैश्विक लढा महत्त्वाचा, पण स्त्रीमुक्तीपेक्षा ,दोघांच्या साथीने संसार होतो. गुणवंत स्त्रीचा सत्कार करताना तिच्या पाठीशी सोबत असणाऱ्या जोडीदारासाठी सत्कार होणे आवश्यक!असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या द ग्लोबल टाइम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर यांनी केले.

"समाजात विकृती वाढतेय, तांत्रिक प्रगती होतेय, हातातल्या फोनवर आपला मुलगामुलगी काय करते याकडे आई - वडिलांचं लक्ष असायलाच हवं. धर्मादाय न अडकता आपल्या मुलांना समाजात योग्य वावरण्याची कला शिकवणे ही मोठी जबाबदारी आहे. स्त्रीबिजाच्या माफियागिरीपर्यंत निर्लज्ज विकृत लोक पोहोचलेत आणि म्हणूनच मुलींना जगण्याची कला नी सावधानता कळणे ही आजची गरज आहे. म्हणून पालकांची जबाबदारी मोठी आहे. " याविषयी सविस्तर बोलून "मराठी भाषा ,मराठीपण टिकवायचं तर मराठीतून व्यक्त होणं, साहित्य, ग्रंथालये मजबूत करणं ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे." असेही करदेकर यांनी सांगितले.याप्रसंगी डॉ अनघा विनय राऊत,डॉ.मनीषा प्रनिल नायर, डॉ.रश्मी जीवन जाधव,डॉ.मंगला सुनिल जाधव,ॲडव्होकेट ज्योती दुराफे,केतकी अरविंद सांगळे,अहिल्या सोपान थोरवे,प्रज्ञा गितेश कदम,खेळाडू साक्षी गितेश कदम,आसावरी प्रमोद भोईटे,अनुराधा अनिल कल्याणकर,गायिका स्वप्ना मुरलीधर रोकडे,स्नेहल दिलिप कांबळे,वृंदा वाघमारे,ॲडव्होकेट गाथा ढाले,श्रध्दा सुभाष रुके,सुनिता अंकुश वीर,पत्रकार सहिष्णुता शरद कांबळे,पत्रकार नयन नासिकेत पानसरे आदिंना सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड व ॲडव्होकेट ज्योती दुराफे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत यांनी केले होते.आभार मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,खजिनदार गौतम नि.डांगळे,उपसचिव श्रध्दानंद निकम,सदस्य भूमय्या सोमा,बबन माने,पोपट साठे,विलास देशनेहरे,संजय मयेकर आदिंनी मेहनत घेतली होती.

# जुन्या आठवणींना उजाळा ; काळाधोंडा शाळेत माजी विद्यार्थ्यांचा भावनिक स्नेहमेळावा"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/ उरण रायगड :** उरण तालुक्यातील काळाधोंडा येथील शाळेत १९९४ ते २००० बॅच च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा अत्यंत उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. लहानपणीचे दिवस पुन्हा अनुभवण्यासाठी, जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा विशेष मेळावा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत ८ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाची सुरुवात गावातून ढोल-ताशांच्या गजरात शिक्षकांना फेटे लावून मिरवणूक काढून करण्यात आली. त्यानंतर शाळेच्या प्रांगणात गणेश पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. उपस्थित गुरुजनांचे स्वागत करताना माजी विद्यार्थ्यांनी प्रेमाची भेट म्हणून प्रसिद्ध घारापुरी लेणी येथील भगवान शंकराच्या मूर्तीची प्रतिकृती भेट दिली. विद्यार्थ्यांच्या या सन्मानामुळे शिक्षकही भावूक झाले आणि त्यांनी विद्यार्थ्यांना मनःपूर्वक आशीर्वाद दिले.या प्रसंगी आपल्या बॅचमधील उच्च शिक्षण प्राप्त





केलेल्या डॉ. नीलम पाटील यांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने १९९४-९५ च्या बॅचने आलेल्या सर्व मैत्रिणींसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात सर्व मैत्रिणींना वाण म्हणून पर्स देऊन सन्मान करण्यात आला.या मेळाव्याच्या निमित्ताने अनेक वर्षांनी एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या आवारात पुन्हा एकदा बालपण अनुभवताना अनेकांच्या चेहऱ्यावर आनंदाबरोबरच भावनिक क्षणही पाहायला मिळाले. माजी शिक्षक प्रदीप यादव म्हात्रे, ओटावकर मॅडम यांसह इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, "आज तुम्ही जीवनात यशस्वी होत विविध क्षेत्रांत कार्यरत आहात, याचा आम्हाला अभिमान आहे. तुमच्याकडून मिळालेला हा सन्मान आणि गावातून काढलेली मिरवणूक आम्हाला कायम स्मरणात राहील."

कार्यक्रमात काही माजी विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यातील अनुभव सांगत आजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, मेहनत आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.१९९४ ते २००० या कालावधीतील विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माजी विद्यार्थ्यांच्या टीमने मोठ्या उत्साहाने आणि समन्वयाने परिश्रम घेतले. अनेक वर्षांनी एकत्र आलेल्या मित्र-मैत्रिणींना पुन्हा एकदा शाळेच्या आवारात लहानपण अनुभवण्याचा आनंद मिळाला.या स्नेहमेळाव्यामुळे शाळा, शिक्षक आणि माजी विद्यार्थी यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले तसेच जुन्या मैत्रीला नव्याने उजाळा मिळाला.

# मातृत्वाचा गौरव, संस्कारांचा सोहळा : जांभिवली वाडी शाळेत महिला दिन जल्लोषात"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर/उरण रायगड :** ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत रायगड जिल्हा परिषद शाळा, जांभिवली वाडी येथे शनिवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रथमच अत्यंत उत्साहपूर्ण आणि संस्कारमय वातावरणात महिला दिन साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे हा उपक्रम आदिवासी वाडीवर पहिल्यांदाच आयोजित करण्यात आल्याने गावातील माता-भगिनींसाठी हा क्षण अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा ठरला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या पूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे औक्षण करून पूजन केले. आईच्या ममतेचे आणि तिच्या महानतेचे वर्णन करणारी प्रार्थना विद्यार्थ्यांनी सादर केली. या सुमधुर सादरीकरणामुळे उपस्थित सर्व माता-भगिनी आणि ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले.





शाळेच्या उपशिक्षिका ज्योती किसन भोपी यांनी महिला दिन का साजरा केला जातो आणि त्यामागील सामाजिक महत्त्व काय आहे याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर शाळेचे मुख्याध्यापक सुरेश म्हात्रे यांनी समाजातील कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत महिलांचे योगदान अधोरेखित केले. महिला दिनानिमित्त उत्कर्ष महिला मंडळ, करंजाडे यांच्या अध्यक्षा आशा केरेकर, खजिनदार अर्चना रसाळ व सेक्रेटरी रेश्मा मोरे यांनी दिलेला केक उपस्थित महिलांच्या शुभहस्ते कापण्यात आला. या प्रसंगी अनेक महिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले आणि वाडीतील महिलांसाठी हा सोहळा अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थिनींनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. तसेच महिलांसाठी खास संगीत खुर्ची या खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विजयी ठरलेल्या माता-भगिनींचा गुलाब पुष्प देऊन गौरव करण्यात आला. शेवटी सर्व विद्यार्थी आणि मातांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या कार्यक्रमाला जांभिवली वाडी गावच्या माजी सरपंच देवकी निकम, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा पद्मा पवार, प्रेरणा संस्थेच्या जेनी मॅडम व रायकर मॅडम, अंगणवाडी सेविका अस्मिता कोंडीलकर, पोषण आहार सेविका रेश्मा कोंडीलकर यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमानंतर अनेक महिलांनी आपले मनोगत व्यक्त करत, "आमच्या आदिवासी वाडीवर असा सन्मानाचा आणि प्रेरणादायी कार्यक्रम प्रथमच होत आहे," असे सांगत शाळेच्या शिक्षकांचे मनापासून कौतुक केले.